


# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे



✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष - २ रे. ✻ अंक ६२ वा. ✻ गुरूवार दि.२१ ऑगस्ट २०२५ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 2 ✻ Ishue - 62 ✻ Thursday 21 August 2025 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

# संवेदनशील आमदार डॉ.अतुलबाबांकडून पूरस्थितीची पाहणी

## आपत्ती काळात जीवितहानी टाळण्यासाठी दक्षतेचे निर्देश



पूरग्रस्तांना कोणताही त्रास होणार नाही यासाठी सर्व यंत्रणा सज्ज आहेत. प्रशासनाशी समन्वय राखून वेळेत मदत व सेवा पोहोचवली जाईल, असे आश्वासनही आ.डॉ.अतुलबाबा भोसले यांनी यावेळी दिले.



कराड : महाराष्ट्रात पावसाचा आहाकार माजला असताना कराडमध्ये कृष्ण - कोयना नदीला महापुराची परिस्थिती निर्माण झाल्याने कराड दक्षिणचे संवेदनशील आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी प्रत्यक्ष बाधित नदीकाठच्या कराड शहर व तालुक्यातील गावांची पाहणी केली. प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत पाहणी करून बैठक घेतली आणि बाधितांना सुरक्षित हलवण्याच्या सूचना केल्या.

दरम्यान कृष्णा आणि कोयना नदीच्या पुराचा धोका वाढत असल्याने कराड शहरासह परिसरातील पूरस्थितीचा आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी प्रत्यक्ष आढावा घेतला. यावेळी त्यांनी नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीच्या उपाययोजना राबवाव्यात, आपत्ती काळात कोणतीही जीवितहानी वा नुकसान होऊ नये



यासाठी दक्षतेने काम करावे, अशा स्पष्ट सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

डॉ. अतुलबाबा भोसले यांनी दत्त चौक, पाटण कॉलनी, कृष्णा घाट या भागांना भेट देऊन पाहणी केली. शाळा क्रमांक तीनमध्ये स्थलांतरित कुटुंबांच्या सोयीसुविधांची तपासणीही केली. यावेळी माजी नगरसेविका स्मिता हुलवान यांनी कोयना कॉलनी परिसराला पूराचा धोका असल्याने संरक्षक भिंतीची गरज असल्याचे निदर्शनास आणून दिले. या पाहणीत भाजप नेते विक्रम पावसकर, माजी नगराध्यक्ष जयवंतराव पाटील, सुहास जगताप, आप्पा माने, शिवराज इंगवले, प्रांत प्रमुख अतुल म्हेत्रे यांच्यासह जिल्हा प्रशासनातील अधिकारी उपअधीक्षक राजश्री पाटील, तहसीलदार कल्पना ढवळे, पोलीस निरीक्षक राजू ताशिलदार, मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर उपस्थित होते.

यानंतर शासकीय विश्रामगृह येथे घेतलेल्या आढावा बैठकीत आमदार डॉ अतुलबाबा भोसले म्हणाले, पूरस्थिती निर्माण झाली की अनेक नागरिक पाणी पाहण्यासाठी गर्दी करतात. हे 'पूर पर्यटन' धोकादायक असून दुर्घटना घडल्यास प्रशासनावर अतिरिक्त ताण येतो. म्हणून नागरिकांनी जबाबदारीने वागून अशा घटना टाळाव्यात. गेल्या काही दिवसांतील अतिवृष्टीमुळे कोयना धरणातून मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरू असून, कृष्णा नदीकाठच्या वस्त्यांना पूराचा फटका बसला आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. भोसले यांनी अधिकाऱ्यांना तातडीने मदतकार्य सुरू ठेवण्याचे, नागरिकांना मौल्यवान साहित्य सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी व्यवस्था करण्याचे तसेच गरज पडल्यास पुनर्वसनाची तयारी ठेवण्याचे निर्देश दिले.

# श्री क्षेत्र नृसिंहवाडीतील संपूर्ण श्री दत्त मंदिर पुराच्या पाण्याखाली गेले

## कृष्णा, पंचगंगेच्या पाणी पातळी सात फुटाने वाढ

(संदिप आडसुळ)

शिरोळ : शिरोळ तालुक्यासह राधानगरी कोयना धरण पाणलोट क्षेत्रात पडलेल्या पावसामुळे कृष्णा पंचगंगेची पाण्याची पातळी वाढल्याने श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथील दत्त मंदिर पाण्याखाली गेले आहे.



तसेच तालुक्यातील चारही बंधारे पाण्याखाली गेले असून शिरढोण,औरवाड जुना पूल पाण्याखाली गेले असून तालुक्यातील अनेक गावचा संपर्क तुटला असून दोन मार्ग बंद वाहतूकीस बंद झाले आहेत. गेल्या चोवीस तासात कोयना राधानगरी धरण पाणलोट क्षेत्रासह शिरोळ तालुक्यात पडलेल्या मुसळधार पावसामुळे तालुक्यातील कृष्णा पंचगंगा नद्यांच्या पाण्याच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे यामुळे श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथील दत्त मंदिर पूर्ण पाण्याखाली गेले आहे. श्रींची उत्सवमूर्ती भक्तांच्या दर्शनासाठी मुख्य मंदिराच्या वरील बाजूस असणाऱ्या नारायण स्वामी मंदिरात ठेवण्यात आली आहे येथेच सर्व पूजा अभिषेक नित्यक्रम सुरू आहेत पाण्याची पातळी झपाट्याने वाढल्याने शिरोळ तालुक्यातील शिरोळ ,तेरवाड राजापूर, बंधारे पाण्याखाली गेले आहेत तर जुना कुरुंदवाड शिरोळ तसेच कुरुंदवाड शिरढोण मार्ग वाहतुकीस बंद झाला आहे आज, बुधवार सकाळपासून पावसाने उघडीप दिली असली तरी कोयना, राधानगरी धरणातून विसर्ग सुरु असल्याने नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. राधानगरीचे स्वयंचलित दरवाजे खुले होण्याची शक्यता आहे यामुळे पंचगंगेच्या पातळी आणखी वाढण्याची शक्यता असून महापुराचा धोका संभवत आहे नदीकाठच्या अनेक घरांमध्ये पुराचे पाणी शिरले आहे यामुळे तेथील नागरिक सुरक्षित स्थळी स्थलांतरित होत आहेत कृष्णा, पंचगंगेचे पाणी पात्राबाहेर गेल्याने मंदिरासह शेती पाण्याखाली गेली आहे. अनेक मार्गावरील वाहतूक बंद झाली आहे. दत्त मंदिर पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने दत्त देवस्थानमार्फत मंदिर परिसरातील सर्व साहित्य सुरक्षित ठिकाणी हलविण्यात येत आहे. मंदिर परिसरातील वेदमूर्ती भैरंभट जेरे पुजारी प्रसादालय, धार्मिक विधी हॉल, दशक्रिया विधी हॉल या ठिकाणी कृष्णा व पंचगंगा नदीचे पाणी आले आहे.

नृसिंहवाडी गावच्या तिन्ही बाजूंनी नदी असल्याने पुराच्या पाण्याने नृसिंहवाडीला वेढा घालण्यास सुरुवात झाली आहे नृसिंहवाडी येथील येथील बाबर प्लॉटमधील रामनगर येथील काही भागात पाणी जाऊ लागल्याने येथील लोक स्थलांतराच्या तयारीत आहेत तसेच करूंदवाड भैरववाडी पुला नजीकच्या जनावरांच्या गोठ्यात आणि कांहीं घरात पुराचे पाणी शिरल्यामूळे येथील नागरीक स्थलांतर झाले आहेत.

# मंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते कोयना धरण जलाशयात जलपूजन

## कोयनामाईची खणा नारळाने भरली ओटी

पाटण : कोयना धरणात ९६.३८ टक्के टी.एम.सी. पाणीसाठा झाला आहे. या धरणातील जलाशयातील जलपूजन पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केले. कोयना धरणस्थळी झालेल्या जलपुजन कार्यक्रमास जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता अभय काटकर, प्रांताधिकारी सोपान टोम्पे, तहसीलदार अनंत गुरव, कार्यकारी अभियंता महेश रासनकर आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. देसाई यांनी कोयना धरणातील जलाचे विधिवत पूजन करून ओटी भरण केले. यावेळी ते म्हणाले, कोयना धरणास महाराष्ट्राची भाग्यरेखा म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राच्या विशेषतः पश्चिम महाराष्ट्राच्या भरभराटीमध्ये, संपन्नतेमध्ये या धरणाचा फार मोलाचा वाटा आहे. आज परंपरेने रितीरिवाजाप्रमाणे प्रशासनास घेऊन जलपूजन करत असताना सध्या धरणात १०१ टीएमसी पाणीसाठा आहे.

पाण्याचा ९९००० क्युसेक्सने विसर्गही सुरू आहे. कोयना धरण हे १०० टीएमसीच्यावर भरल्याने कोयनामाईची अशीच कृपा संपूर्ण महाराष्ट्रावर व्हावी, सुजलाम सुफलाम महाराष्ट्र व्हावा, पाण्याची टंचाई भासू नये, मुबलक वीज निर्मिती व्हावी, यासाठी कोयनामाईचे पूजन



करण्यात आल्याची भावनाही पालकमंत्री श्री. देसाई यांनी यावेळी व्यक्त केली.

धरण क्षेत्रात पाऊस होत असला तरी संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचे सांगून पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, पूर परिस्थितीवर आवश्यक ती उचित कार्यवाही करण्याच्या प्रशासनास सूचना देण्यात आली आहे.

कोयना भागातील व पाटण मधील काही कुटुंबांना स्थलांतरण करावे लागले आहे. स्थलांतरणानंतर त्यांच्या निवाऱ्याची जेवणाची, पिण्याच्या पाण्याची सोय, अंथरुन पांघरुनाची सोय करण्यात आली आहे.

नागरीकांनी घाबरुन जाऊ नये, प्रशासन तुमच्या पाठीशी आहे. पोलीसपाटील, तलाठी, मंडलधिकारी, ग्रामसेवक यांना आपल्या गावात थांबण्याच्या सूचना दिल्या आहेत. सातारा जिल्ह्यातील पाटण, कराड, सातारा, वाई, जावली या ठिकाणी भेटी देऊन पूर परिस्थितीचा आढावाही घेणार असल्याचे पालकमंत्री श्री. देसाई यांनी यावेळी सांगितले.

# कोयना वसाहत आदर्श ग्रामपंचायत करण्याचा संकल्प : डॉ.सुरेश भोसले

कराड : कोयना वसाहत ही कराड तालुक्यातील एक प्रगतिशील वसाहत असून शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि सांस्कृतिक परंपरांमुळे या गावाला विशेष ओळख आहे. गावाचा पुढील २५ वर्षांचा ठोस विकास आराखडा तयार करुन, कोयना वसाहतीला आदर्श ग्रामपंचायत करण्याचा आमचा संकल्प आहे, असे प्रतिपादन कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले यांनी केले. कोयना वसाहत येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

कोयना वसाहत (ता. कराड) येथे साकारण्यात आलेल्या स्व. जयमाला जयवंतराव भोसले स्मृती उद्यान आणि कै. भिकोबा दादू थोरात (नाना) प्रवेशद्वाराचे लोकार्पण कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले आणि आ.डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सौ. उत्तरा भोसले, श्री. विनायक भोसले, कृष्णा कारखान्याचे संचालक दयानंद पाटील, धोंडीराम जाधव, कृष्णा बँकेचे संचालक शिवाजीराव थोरात, कोयना वसाहतीच्या सरपंच सुवर्णा वळीव, उपसरपंच उमेश कुलकर्णी, श्री शिवराज सहकारी गृहनिर्माण सोसायटीचे चेअरमन शरद पाटील, व्हाईस चेअरमन सौ. प्रियांका कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी बोलताना डॉ. सुरेश भोसले म्हणाले, की कोयना वसाहतीला आदर्श ग्रामपंचायत करण्याचा आमचा संकल्प आहे. पर्यटनाच्या दृष्टीने कोयना वसाहतीत प्रचंड क्षमता असून, आगाशिव डोंगर परिसरातील पर्यटनाला चालना मिळाल्यास इथे पर्यटनाचे नवे केंद्र निर्माण होऊन, त्याचा लाभ आपल्या गावाला होऊ शकेल. गावातील सांडपाणी व कचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या उभारणीसाठी तातडीने प्रयत्न करण्याची गरज आहे. येत्या काळात गृहिणींना लघुउद्योग सुरू करण्यासाठी आर्थिक पाठबळ आणि सार्वजनिक जागांचा विकास करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

आ.डॉ. भोसले म्हणाले, की कोयना वसाहतीमध्ये सुशिक्षित व उच्चविद्याविभूषित लोकांची मोठी वस्ती आहे. या गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी येत्या २५ वर्षांचा दूरदर्शी विकास आराखडा आखण्याची गरज आहे. जेणेकरुन अर्बन प्लॅनच्या धर्तीवर या गावाचा विकास होईल. येत्या काळात केंद्र व राज्य सरकारच्या अनुदानाचा लाभ घेऊन, 'सोलर ग्राम' म्हणून कोयना वसाहतीची ओळख निर्माण करण्याचा माझा ध्यास आहे.येत्या साडेचार वर्षात कोयना वसाहतीतील प्रत्येक गल्लीतील रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल. तसेच भूमिगत गटर व ड्रेनेजसाठी आराखडा तयार करून राज्य सरकारकडून निधी आणला जाईल. गावातील सर्व स्ट्रीटलाईट सौर ऊर्जेवर आधारित करण्याचा मानस आ.डॉ. भोसले यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाला बालिश थोरात, प्रमोद पाटील, डॉ. राजेंद्र पाटील, सुधाकर गुरव, बाळासाहेब वाठारकर, सौ. सुनीता थोरात, सुजाता पवार यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, श्री शिवराज सहकारी गृहनिर्माण सोसायटीचे सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय....


## माणूसकी संपत चालली!

सामान्यतः भीक मागणाऱ्यांची संख्या विचार करायला लावणारी. दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्यांपैकी, देवळाबाहेर, ट्राफिक सिग्नलपाशी भीक मागणाऱ्या दरिद्री नारायणाचे भिक्षापात्र आजन्म रिकामी राहते ते यासाठीचं. पोटाची खळगी, पेटलेला भुकेचा डोंब परमेश्वरालाही जाब विचारल्याशिवाय राहत नाही. दिसामाजी पदरात पडलेलं, एकेका दिसालाही पुरेल की नाही याची शाश्वती कमीचं. मिळवलेल्या अल्प जिन्नसावर, मिळकतीवर कुणा हरामखोराने डल्ला मारावा तर हा विषय जास्तचं त्रासदायक. खरं म्हणजे ज्याच्या त्याच्या ताटातलं खाणारे आपण कोण? एवढीही माणुसकी शाबूत राहिलेली नाही. विवंचनेत पडलेल्या नारायणाची बेचैनी माझं मन मात्र पोखरत गेली. वैयक्तिक स्वार्थाकरिता मनुष्याने सत्याचे केलेले विकृतीकरण हे समाजमन ढासळवणारे आहे. स्वार्थाचा, वासनांचा, अहंकाराचा आणि सुखोपभोगाचा होम पेटला तेव्हा मी नारायणात स्वातंत्र्याचा अंगार फुललेला पाहिला. नि:स्वार्थीपणे चांगल्या सत्कार्यासाठी भीक मागायची लाज का? विचार करायला लावणारी गोष्ट म्हणजे देवळाबाहेरच्या रस्त्यापासून सुरू झालेला माणूसकीचा सामाजिक अध्याय घरादारापर्यंत पोहोचला तरी अनभिज्ञ आहोत आपण. माणूसपण हरवल्याची उदाहरणं आसपास घडतात तेव्हा ती बघण्यापलीकडे आपल्या हाती काही उरत नाही. कारण तो विषय आपल्या घरातला नसतो; परंतु कधीकाळी आपल्या बाबतीत या घटना घडल्या तर मात्र आपले डोळे ताडकन उघडतात. समाजघातक, लाजिरवाणा ठरलेला, विनाशाकडे नेणारा हा मार्ग मानवी संबंधावर भाष्य करणारा आहे.

स्वत:ला प्रामाणिक माणूस बनवा म्हणजे एक लबाड माणूस त्वरित कमी होईल असं थोर विचारवंत थॉमस कालाईल सांगून गेलेत. मनुष्याचा मोठेपणा आपापले काम प्रामाणिकपणे करण्यात आहे. ध्येयसिद्धीचा खरा पाया आणि साधन म्हणजे प्रामाणिकपणा. प्रामाणिकपणे कर्तव्य, कर्म करत राहणं याला जो देवपूजा मानतो, त्याला लबाडीत मिळणारा आनंद अशक्य असतो. प्रामाणिकपणा अस्तित्वातचं नसेल तर त्याला जन्माला घातला पाहिजे. माणूसपण मिळविण्याचा तो एक वैभवशाली मार्ग असू शकेल. प्रामाणिकपणा, कृतज्ञता हे आपण समाजाचं देणं लागतो. भावना आणि आशावाद या कशातही न गुरफटलेले मूल्यमापन म्हणजे प्रामाणिकपणा होय; परंतु थॉमस यांच्या मते प्रामाणिकपणाचा मापदंड विसाव्या शतकापासून ढासळलेला दिसतो. विषयाचा दोन्ही बाजूने विचार करता प्रथम माणूसकी जपणारी माणसं विचारात घ्यायला हवीत. अशी माणसं लाखात एक असतात, जी हिऱ्याप्रमाणे चमकतात. तरी माणूसपण हरवल्याची दखलपात्र उदाहरणं आपल्या अवतीभवती सर्रास दिसून येतात. यामध्ये विवेकनिष्ठ दुर्गतीचा रस्ता मोठा असतो. याला बरीच कारणं आहेत. जागतिकीकरणाच्या बदललेल्या व्याख्या, यांत्रिकीकरण, सत्तालोलुपता. भरीस भर म्हणून लोकसंख्यावाढ, सुख, युद्ध, बेकारी, उपासमार या गोष्टी मानवाला बदल करण्यास भाग पाडत आहेत. कोण्याकाळी मनुष्याची श्रीमंती म्हणजे त्याचं उत्तम चारित्र्य होत. पण आजचं चित्र वेगळं आहे.

नव्या जमान्यातील बदललेले वारे, हव्यास, धनलालसा, नेहमीच दिसत असलेले दुसऱ्याचे दोष, कामाची निष्क्रियता यात आपण गुंतत चाललो आहोत. जे आहे ते माझं अन् माझ्यापुरताचं असं मानून सदसद्विवेकबुद्धीचा ऱ्हास करून घेतलेले आपल्यासारखे आपण पुढच्या पिढीला वाईट विचारांच्या पोथी सुपूर्त करत आहोत. एखाद्या नात्यामध्ये निर्माण झालेली तेढ, अहंकार, भौतिक सोयी सुविधांचा हव्यास, सुखलोलुपतेची चटक, कोटी कोटी हातांच्या मुठीत म्हटल तर सगळं आहे. आपल्या जीवनाचं सार सांगणारी ही मूठ ढिली पडली, तर नाती नुसती चव्हाट्यावर येणार नाहीत, तर भावनिक विध्वंसास कारणीभूत ठरतील. अंत:करणातील नम्रता विसरल्याने डोळे असूनसुद्धा आपणास अंधत्व आले आहे. आपल्या मनाला इतरांचा विचार शिवत नाही. मदतीचा हात पुढे येत नाही कुणास. वाईट गोष्टींच्या आहारी गेलेला महत्त्वाकांक्षेचा राक्षस आपल्या डोक्यावर नाचतोय. यायोगे कर्म, धर्म, गीतासार, संस्कार, आचार, विचार मागे पडत चालले आहेत. अवजड यंत्रापेक्षा मानवीय भाव भावनांचा सहज स्पर्श माणुसकीला बांधून ठेऊ शकतो हे सत्य स्वीकारलं नाही, तर कुणी कुणाचं उरणार नाही असं भयंकर वादळ दाराशी घोंघावेल, ज्यायोगे मानव जातीला पुढे जाऊन भयंकर परिणामांना तोंड द्यावे लागेल.

# शिराळा तालुक्यात पूरस्थितीवर सतर्कतेचे निर्देश





शिराळा : शिराळा तालुक्यातील काही गावांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली असून आपत्तीजनक स्थितीची शक्यता लक्षात घेता सर्व विभागांनी सतर्क राहावे, अशा सूचना आमदार सत्यजित देशमुख यांनी दिल्या. तहसीलदार कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

जिल्हाधिकारी अशोक काकडे, प्रांताधिकारी श्रीनिवास अर्जुन, तहसीलदार शामला खोत पाटील, गटविकास अधिकारी प्रकाश पोळ यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी काकडे म्हणाले, महसूल, पोलीस, पाटबंधारे, आरोग्य, बांधकाम, विद्युत विभाग, जिल्हा परिषद व प्रसारमाध्यमे यांचा योग्य समन्वय आवश्यक आहे. बचाव पथके, होड्या, यांत्रिक बोटी, पोहणारे व इतर साधनसामग्रीची तपासणी करावी. तसेच पूरामुळे बंद होणाऱ्या रस्त्यांसाठी पर्यायी मार्ग आखणी करावी.

आ. देशमुख यांनी निर्देश दिले की, आपत्तीच्या काळात जनतेची गैरसोय होऊ नये यासाठी तातडीच्या उपाययोजना राबवाव्यात. औषधांचा पुरेसा साठा ठेवावा, गरोदर महिला व लहान बालकांची विशेष काळजी घ्यावी. गावात औषध फवारणी, तात्पुरत्या निवारा केंद्रांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात. कृषी विभागाने नुकसानीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे, तर पाटबंधारे विभागाने काटेकोर नियोजन करावे.

# गणेशमूर्ती शास्त्रानुसार कशी असावी



आपण आनंदाने उत्साहाने गणेशोत्सव साजरा करत असतो प्रत्येकांच्या घरी गणपतीची प्राणप्रतिष्ठा केली जाते भावपूर्ण पूजा ही करतात. शास्त्रानुसार गणपतीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केल्यास अध्यात्मिक स्तरावर लाभ होत असतो.

आजकाल बाजारात आपण वेगवेगळ्या स्वरूपाच्या मूर्ती पाहतो. काही गणेश मूर्ती वेगवेगळ्या रूपात दाखवतात. उदाहरणार्थ अन्य देवतांच्या रूपात किंवा अन्य संतांच्या रूपात राष्ट्रपुरुषांच्या रूपात क्रांतिकारकांच्या रूपात किंवा वेगवेगळ्या प्राण्यावर बसलेल्या गणेशमूर्ती असतात. अशा गणपतीची पूजा करण्यापेक्षा शास्त्रात सांगितल्याप्रमाणे गणपतीची मूर्ती पुजायला हवी. मूर्ती देवतेच्या मूळ रूपाशी जितकी साम्य असणारी असेल जितके तिच्याकडे त्या देवतेचे तत्त्व जास्त प्रमाणात आकृष्ट होत असते. आपले ऋषीमुनी व संत यांनी शास्त्र लिहिली आहेत .त्यांना देवतांचा जसा साक्षात्कार झाला तशी त्यांनी देवतांची वर्णने शास्त्रात केली आहेत .शास्त्रात सांगितल्याप्रमाणे मूर्तीचे पूजन केल्यास अध्यात्मिक स्थरावर लाभ होतो गणपतीची मूर्ती गणपती अथर्वशीर्षात वर्णन केल्याप्रमाणे असावी .म्हणजे गणपती एकदंत असलेला ,चार हात असलेला ,हातामध्ये पाश व अंकुश असलेला एक हात आशीर्वाद असलेला व पाटावर बसलेला हवा व शाडूच्या मातीचा असावा.

शास्त्रानुसार बनवलेल्या मूर्तीत देवतेचे तत्व आकर्षित आणि प्रक्षेपित करण्याची क्षमता जास्तीत जास्त असते अशा गणपतीचे पूजन केल्यास अध्यात्मिक स्तरावर आपणास लाभ होतो. अधिक माहितीसाठी आपण सनातन निर्मित गणपती हा ग्रंथ संग्रही ठेवू शकतो. आपण सर्वांनी शास्त्रात सांगितल्याप्रमाणे गणपतीच्या मूर्तीचे पूजन करूया

**– नलिनी सूर्यवंशी,**
कोयना वसाहत कराड

# खंडपीठ स्थापनेत ॲड.भीमराव शिंदे यांचा सिंहाचा वाटा




कराड : कोल्हापूर येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन व्हावे, यासाठी कराड वकील संघटनेचे माजी अध्यक्ष ॲड. भीमराव शिंदे यांनी सिंहाचा वाटा उचलला आहे. वकील संघटना आणि जनतेचा हा संघर्ष तब्बल चाळीस वर्षे सुरू होता. सुरुवातीला वकिलांनी सुरू केलेल्या या लढ्याला व्यापक लोकाधार मिळावा, हे ओळखून शिंदे यांनी जनतेतूनच आंदोलन उभे केले.

तत्कालीन मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश मोहित शहा यांना शेतकरी, कष्टकरी आणि जनतेतून जवळपास १५ हजार पत्रे पाठवण्यात आली. या पत्रव्यवहाराची दखल घेऊन न्यायमूर्ती शहा यांनी शिंदे यांना समक्ष बोलावून खंडपीठ स्थापनेबाबत विचारपूस केली.

त्यावेळी शिंदे यांनी सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांतील पक्षकारांवर होणारे अन्याय, त्यांचा वाया जाणारा वेळ आणि आर्थिक नुकसान अधोरेखित केले. खंडपीठ ही केवळ वकिलांची नव्हे तर सामान्य जनतेचीच मागणी आहे, तसेच त्यासाठी १५ हजार पत्रे पाठवली आहेत, असे त्यांनी ठामपणे सांगितले. सहा जिल्ह्यांत तब्बल ५८ दिवस झालेले आंदोलन, तसेच खटले कोल्हापूर खंडपीठात चालवल्यास जनतेला होणारा थेट फायदा, याचेही तात्विक स्पष्टीकरण त्यांनी न्यायमूर्तींना दिले.

यावर प्रभावित होऊन न्यायमूर्ती शाहांनी खंडपीठ स्थापनेची सकारात्मक भूमिका घेतली होती, मात्र त्यावेळी निर्णय झाला नाही.

या अपयशानंतरही ॲड. शिंदे शांत न बसता आंदोलन अधिक वेगाने सुरू ठेवले. त्यांनी सामाजिक संघटनांना सोबत घेतले. यामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील संघटनेचे जिल्हाध्यक्ष व शेतकरी चळवळीचे नेते विजयसिंह पाटील कालेकर, शेतकरी संघटनेच्या महिला जिल्हाध्यक्ष रंजनाताई पाटील, गायत्री उद्योग समूहाचे अशोकराव पाटील, युवराज भोईटे यांचा सहभाग लक्षणीय ठरला. सांगोला येथील सहा जिल्ह्यांच्या वकील शिबिरासाठी ते कराडवरून टू-व्हीलरवर गेले होते. त्यावेळी त्यांच्यासोबत विजय पाटील कालेकर उपस्थित होते.

कोल्हापूर खंडपीठ कृती समितीतही त्यांनी खंडपीठ मंजूर होईपर्यंत आंदोलन मागे घेऊ नये अशी ठाम भूमिका घेतली. त्यामुळे या आंदोलनाला ठोस दिशा मिळाली. आज खंडपीठ स्थापन झाल्याने त्यांच्या कष्टांची व प्रयत्नांची चीज झाल्याचे बोलले जात आहे.

देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनीदेखील त्यांच्या या लढ्याची दखल घेतली आहे. छत्रपती शाहू महाराजांच्या पवित्र भूमीत खंडपीठ स्थापन झाल्याचा त्यांना अत्यानंद झाला. ही बातमी समजताच कराड व परिसरात पेढे, लाडू वाटप करून जल्लोष करण्यात आला. कराड न्यायालयात त्यांनी प्रथम देणगी देऊन खंडपीठासाठी आवश्यक असणारे सर्व प्रयत्न करण्याची ग्वाही दिली.

# कृष्ण जन्माष्टमी सोहळा कराडमध्ये उत्साहात साजरा

## सोहळ्याचे १०४ वे वर्षे; विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न

कराड (प्रतिनिधी): येथील कृष्णा घाटावरील राधा-कृष्ण मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. राधा-कृष्ण मंदिरातील श्रीकृष्ण जन्माच्या सोहळ्याचे हे १०४ वे वर्षे होते. यानिमित्त अनेक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

श्रावण महिन्यात कृष्ण अष्टमीला श्रीकृष्ण जन्म सोहळा असतो. त्यानुसार यावर्षी शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट रोजी कृष्णा घाटावरील गरुड मामांच्या राधा-कृष्ण मंदिरात हा जन्माष्टमी सोहळा अत्यंत उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. सकाळी सहा ते आठ या वेळेत राधाकृष्णास दुग्धाभिषेक करण्यात आला. सकाळच्या अभिषेक कार्यक्रमात अनेक भाविक सहभागी झाले होते. दुपारी तीन ते पाच या वेळेत भजन सेवा संपन्न झाली. सायंकाळी पाच वाजता गुणवंत विद्यार्थी व सामाजिक कार्य करणाऱ्या निवडक लोकांचा



मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

तसेच रात्री दहा ते बारा या वेळेत सातारा येथील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. भक्ती देशपांडे-काणे यांचे श्रीकृष्ण जन्मकाळाचे सुश्राव्य कीर्तन मोठ्या उत्साहात पार पडले. यामध्ये त्यांनी श्रीकृष्णाचा जन्म भाद्रपद कृष्ण अष्टमीस झाला, म्हणून या दिवसाला जन्माष्टमी म्हणतात. श्रीकृष्ण हे धर्मसंस्थापक, दुष्टांचा संहारक व भक्तांचे रक्षण करणारे अवतार मानले जातात.

या दिवशी उपवास, जागरण, नामस्मरण व कीर्तन करून भक्त भगवान श्रीकृष्णाला प्रसन्न करतात. गोकुळातील दही-हंडी, मुरली-रास, भजन-कीर्तनाद्वारे उत्सव साजरा होतो. कृष्णाच्या जन्मकथेमुळे सत्य, प्रेम, भक्ती व धर्मनिष्ठ जीवन जगण्याचा संदेश मिळतो. जन्माष्टमी हा अधर्मावर धर्माचा विजय व भक्तासाठी भगवान सदैव उपस्थित असतात, याचे स्मरण करून देणारा पवित्र दिवस असल्याचे सांगितले. हा जन्माष्टमीचा उत्सव यशस्वी करण्यासाठी राधाकृष्ण देवस्थान ट्रस्ट, तसेच ट्रस्टचे सर्व संचालक उत्साहात सहभागी झाले होते.

# सिद्धिविनायक व्रत्त कोणी करावे

आपण भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गणपतीची प्राणप्रतिष्ठा करून गणपती बसवतो .त्याचे मूळ सिद्धिविनायक व्रतात आहे .मातीचा गणपती करतात तो गणपती डाव्या हातावर घेऊन तेथेच त्याची सिद्धिविनायक या नावाने प्राणप्रतिष्ठा करून मनोभावे पूजा करून लगेचच विसर्जन करावे असा शास्त्रविधी आहे पण मनुष्य हा उत्सव प्रिय प्राणी आहे म्हणून तो दीड पाच सात दहा दिवस गणपती ठेवून त्याचा उत्सव करू लागले काही जण गौरी बरोबर गणपती विसर्जन करतात एखाद्याच्या कुलाचारात पाच दिवस गणपती असेल आणि त्याला दीड दिवसाचा करायचा असेल तरी तो करू शकतो.

सिद्धिविनायक व्रत्त हे सर्व कुटुंबात होणे आवश्यक आहे .सगळे भाऊ एकत्र असतील म्हणजे त्यांचे सर्व व्यवहार एकत्र असतील त्यांचा पैसा एकत्र असेल स्वयंपाक घर म्हणजे चूल एकत्र असेल तर सर्वात मिळून एकमूर्तीची पूजा करावी जर स्वयंपाक घर व आपला पैसा कोणत्या कारणाने वेगळा असेल तर प्रत्येकाने आपापल्या घरी स्वतंत्र गणेश मूर्ती स्थापित करावी ज्या कुटुंबात एकच गणपती बसवण्याची प्रथा असेल आणि ती मोडायची नसेल तर कुटुंबामध्ये ज्या भावामध्ये देवाविषयी अधिक भाव आहे त्याच्या घरी गणपती बसवावा.

आपल्या कुलाचाराप्रमाणे आपणही गणपतीची प्राणप्रतिष्ठा करून भावपूर्ण पूजा करून गणपतीच्या कृपेस पात्र होऊया

**– नलिनी सूर्यवंशी,** कोयना वसाहत कराड.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती कराड येथे साजरी होणार

कराड : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट रोजी यशवंतराव चव्हाण स्मृती सदन, कराड येथे विविध कार्यक्रमांनी साजरी होणार आहे. याची माहिती जयंती महोत्सव समितीचे संस्थापक निमंत्रक प्रकाश वायदंडे व अन्य पदाधिकाऱ्यांनी दिली.

दुपारी २ वाजता कवी अनंत राऊत यांच्या कवितासादरीकरणाने 'काव्य मैफिल' होणार आहे. त्यानंतर दुपारी ३ वाजता 'समाज प्रबोधन मेळावा व सन्मान सोहळा' होणार असून, कराड दक्षिणचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या हस्ते उद्घाटन होईल. अध्यक्षस्थानी श्रमिक मुक्ती दलाचे नेते डॉ. भारत पाटणकर राहतील.

या सोहळ्यात माजी मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते रॅमन मॅगसेसे व पद्मश्री पुरस्कार विजेते डॉ. प्रकाश आमटे व डॉ. सौ. मंदाकिनी आमटे यांना 'जीवन गौरव पुरस्कार' प्रदान केला जाणार आहे. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांना 'समाज गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येईल.

कार्यक्रमात प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे मार्गदर्शन करणार असून, प्रा. डॉ. शरद गायकवाड (महावीर महाविद्यालय, कोल्हापूर) व्याख्यान देतील. यावेळी अण्णाभाऊ साठे यांची सून सौ. सावित्रीमाई साठे, विविध मान्यवर, लोकप्रतिनिधी व युवा नेते उपस्थित राहणार आहेत. विशेष आकर्षण म्हणून मालिकेतून प्रसिद्ध झालेली अभिनेत्री कु. शिवानी मुंढेकर देखील उपस्थित राहणार आहे.

संध्याकाळी ५ वाजता शाहिर चंदन कांबळे (ज्ञान प्रबोधन कलामंच, पुणे) यांचा 'शाहिरी जलसा' होणार आहे. कराडकर व अण्णाभाऊ साठे प्रेमी नागरिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

# शंभुराज देसाई यांनी केली पाटण तालुक्यातील पूरग्रस्त भागांची पाहणी



पाटण - सातारा जिल्ह्यात सुरू असणाऱ्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री शंभूराजे देसाई यांनी आज पाटण तालुक्यातील पाटण, हेळवाक येथील पूर परिस्थितीचे व नवजा कडे खचलेला रस्ता यांची पाहणी करून तेथील परिस्थितीचा आढावा घेतला. या दौऱ्यात त्यांनी पाटण नगरपंचायतीमधील ज्ञानोजीराव साळुंखे हायस्कूल व जुनिअर कॉलेज या ठिकाणी स्थलांतरित करण्यात आलेल्या नागरिकांची भेट घेऊन त्यांनाही दिलासा दिला.

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन - ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा - ४१५११० येथून प्रकाशित केले. ✻ संपादक - गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# शिराळा तालुक्यामध्ये मुसळधार पाऊस, पाणी पातळीत वाढ

## पाणलोट क्षेत्रासह वारणाकाठी सावधानतेचा इशारा

शिराळा : शिराळा तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पाणलोट क्षेत्रात पाण्याची पातळी झपाट्याने वाढत असून, नद्या, नाले, ओढे दुथडी भरून वाहत आहेत. तहसीलदार शामला खोत-पाटील यांनी आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना केली असून, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

तहसीलदार शामला खोत-पाटील म्हणाल्या, नागरिकांना नदी, नाले किंवा ओढ्यामध्ये प्रवेश करू नये. कोणत्याही परिस्थितीत पुलावरून पाणी वाहत असल्यास तो ओलांडू नये. चांदोली धरणातून एकूण ३९,९८५ क्युसेक पाण्याचा विसर्ग वारणा नदीपात्रात सुरू आहे. यामध्ये वक्रद्वारातून २८, ३५५ क्युसेक आणि विद्युतगृहातून १६३० क्युसेक पाण्याचा समावेश आहे. पावसाचा जोर असाच कायम राहिल्यास विसर्गआणखी वाढवला जाण्याची शक्यता आहे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तहसीलदार शामला खोत-पाटील यांनी तलाठी आणि ग्रामसेवकांना आपापल्या गावांमध्ये थांबून परिस्थितीवर लक्ष ठेवण्याचे आदेश दिले आहेत.



वारणा धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये अतिवृष्टी होत आहे. धरणाच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. जलाशय परिचलन सूचीप्रमाणे धरणाचा विसर्ग वाढला आहे. पाऊस वाढत राहिल्यास परिस्थितीनुसार विसर्ग वाढविण्यात येईल. तरी नदीकाठच्या लोकांना सतर्कतेचा इशारा व नदी काठावरील पाणी पातळीचा अंदाज घेऊन सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित व्हावे.

**– सत्यजित देशमुख,**
आमदार, शिराळा



# करा‍ड तालुका पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी सूरज जमदाडे तर उपाध्यक्षपदी विकास कणसे

कराड : कराड तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी सूरज बाळासाहेब जमदाडे यांची तर उपाध्यक्षपदी विकास महादेव कणसे यांची निवड झाली.

फेडरेशनच्या नुकत्याच झालेल्या बैठकीमध्ये या निवडी जाहिर झाल्या. बैठकीचे अध्यासी अधिकारी म्हणुन उपनिबंधक सहकारी पतसंस्थेचे विलास मोरे यांनी काम पाहिले. यावेळी विलास मोरे म्हणाले, सूरज जमदाडे यानी श्री वैभवलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन म्हणून दिलेले नेतृत्व हे आजच्या गतीमान युगात एक आदर्श ठरले आहे. सेवा व सुविधा ग्राहकांपर्यंत तत्परतेने पोहोचविण्याचा त्यांनी स्वीकारलेला ध्यास संस्थेला प्रगतीपथावर घेऊन गेला आहे.

सूरज जमदाडे हे संघर्षांतून पुढे आलेले व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या अंगी असलेली धाडसी वृत्ती, स्पष्टवक्तेपणा आणि





कृतिशील नेतृत्वशैली यामुळे त्यांनी सहकार चळवळीत एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. सहकाऱ्यांना बरोबर घेऊन, सकारात्मक विचारसरणीने काम करण्याची त्यांची पद्धत प्रेरणादायी आहे, असेही मोरे म्हणाले.

सूरज जमदाडे म्हणाले, फेडरेशनच्या माध्यमातुन तालुक्यातील पतसंस्था अर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्यासाठी मदत करणे तसेच ग्राहकांना विविध सेवा उपलब्ध करुण देणेसाठी मार्गदर्शन करणे ही फेडरेशनची जबाबदारी आहे.थकीत कर्ज वसुलीसाठी कायदेशार बाबींची पुर्तता करणे, संस्थांना वसुली अधिकीरी उपलब्ध करुन देणे, संस्थेचा एन.पी.ए शुन्य टक्के वर आणणेसाठी फेडरेशन मार्गदर्शन करणार आहे.तसेच पतसंस्थांचे संचालक, अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन करणार असल्याचेही त्यांनी सागितले. हणमंत पाटील, कृष्णत पाचुपते, सदाशिव माने, जांलिदर पाटील, पंढरीनाथ घराळ, प्रविन पवार, कार्तिकी पाचुपते, सारिका पाटील व शिवाजी निकम यांनी नुतन अध्यक्ष व उपाध्यक्षांचे अभिनंदन केले.

# आपत्ती काळात नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्या : संतोष पाटील

पाटण : जिल्ह्यात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला असून या पार्श्वभूमीवर तालुका आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४ तास कार्यरत ठेवा. अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मुख्यालय, कामाच्या ठिकाणी २४ तास हजर रहा. येणाऱ्या प्रत्येक कॉलला सकारात्मक प्रतिसाद द्या. पूरपरिस्थितीत बाधित होणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला आवश्यकता भासणाऱ्या ठिकाणी नागरिकांचे व पशुधनाचे



तातडीने स्थलांतरण करा आणि अनुषंगिक सुविधांची आवश्यक ती उपलब्धता ठेवा. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्या. नदीकाठच्या गावांनी सतर्कत बाळगून नागरिकांनीही पुराच्या पाण्यात जाणे टाळावे असे निर्देश जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी दिले. जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी पाटण तालुक्यातील पूरपरिस्थितीची पाहणी केली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पाटणचे प्रांताधिकारी टोम्पे, तहसिलदार गुरव महसूल, आरोग्य, वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी ग्रामस्थ उपस्थित होते.

# पूरसदृश्य परिस्थितीमुळे १२९ कुटुंबातील ३६१ नागरिकांचे स्थलांतर

## वाहतूकीवर परिणाम होणारे रस्ते बंद; नागरिकांनी सतर्क राहण्याचे प्रशासनाचे आवाहन






सातारा : कोयना धरणासह धोम, धोम-बलकवडी, कण्हेर, उरमोडी,तारळी व वीर या प्रमुख धरणांमधून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात येत आहे. लोकांना सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासनाकडून नागरिकांना सुरक्षित निवारा शेड, हायस्कूल, शाळा, काहींना नातेवाईकांकडे तात्पुरते स्थलांतरीत करण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

यामध्ये पाटण तालुक्यात पाटण शहरात १३ कुटुंबातील ४५ नागरिकांना, हेळवाक येथील ५ कुटुंबातील १७ नागरिकांना, नावडी, औंध वस्ती येथील ७ कुटुंबातील १५ नागरिकांना, कराड तालुक्यातील कराड शहर, पत्राचाळ, पाटण कॉलनी, कोयना दूध कॉलनी, रुक्मीणीनगर येथील ६ कुटुंबातील २४ नागरिकांना, महाबळेश्वर तालुक्यातील येर्णे बु. येथील ८ कुटुंबातील १८ नागरिकांना, वाई शहरातील ४० कुटुंबातील १३५ नागरिकांना, सातारा तालुक्यातील भैरवगड येथील ३० कुटुंबातील ६५ नागरिकांना,मोरेवाडी येथील २० कुटुंबातील ४२ नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

रस्त्यावर पाणी आल्याने तात्पुरते बंद करण्यात आलेल्या २० ऑगस्ट रोजी रस्त्यांची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहेत. पाटण तालुक्यात नेरळे पूल व मुळगाव पूल, पाबळनपाला रस्ता खचल्याने वाहतूकीसाठी बंद करण्यात आला आहे. कराड- हेळवाक रस्त्यावर पाणी आल्याने बंद., महाबळेश्वर तालुक्यातील देवसरे-मजरेवाडी रस्त्यावर पाणी आल्याने बंद करण्यात आला आहे. वाई तालुक्यातील कृष्णा नदीवरील हमदाबाज-किडगाव पूल, करंज-म्हसवे पूल, मौजे जिहे येथील जिहे-कठापूर रोडवरील पुलावरुन पाणी वाहत असलेने रस्ता वाहतूकीसाठी बंद करण्यात आला आहे. खंडाळा तालुक्यातील नीरा नदीवरील लोणंद (वाठार)-वीर रस्ता व नीरा नदीवरील जून पाडेगाव येथील रस्ता वाहतूकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे. बंद रस्त्यांमुळे पर्यायी रस्ते उपलब्ध असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# कोयना धरणात १०१.४७ टीएमसी पाणीसाठा

पाटण : कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पाऊस वाढल्यामुळे धरणातील पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी कोयना धरणाचे सहा वक्र दरवाजे १२ फुटांवरून १३ फुटापर्यंत उघडून ९५,३०० क्युसेक विसर्ग कोयना नदीपात्रात सोडण्यात आले आहे. कोयना धरणाची प्रकल्पीय एकूण क्षमता १०५.२५ टीएमसी असून आज २० ऑगस्ट रोजी सकाळी ९ वा. पर्यंत १०१.४७ टीएमसी इतका पाणीसाठा झाला आहे . कोयना धरण ९३.६६ टक्के भरले आहे. जिल्ह्यातील इतर धरणांची आज रोजी सकाळी ९ वा.पर्यंतची स्थिती पुढीलप्रमाणे आहे.धोम धरणाची प्रकल्पीय एकूण क्षमता टीएमसी १३.५० असून १३.१८ टीएमसी इतका पाणीसाठा झाला असून ९७.८५ टक्के धरण भरले आहे. धरणातून १७२७४ क्युसेक्स पाणी विसर्गाद्वारे नदीपात्रात सोडण्यात येत आहे. धोम-बलकवडी



धरणाची प्रकल्पीय एकूण क्षमता ४.०८ टीएमसी असून ३.८२ टीएमसी इतका पाणीसाठा झाला असून ९७.७९ टक्के धरण भरले आहे, धरणातून ७३२९ क्युसेक्स पाणी विसर्गाद्वारे नदीपात्रात सोडण्यात येत आहे.कण्हेर धरणाची प्रकल्पीय एकूण क्षमता १०.१० टीएमसी असून ९.५७ टीएमसी इतका पाणीसाठा झाला असून ९६.९३ टक्के धरण भरले आहे, धरणातून १४८२३ क्युसेक्स पाणी विसर्गाद्वारे नदीपात्रात सोडण्यात येत आहे. उरमोडी धरणाची प्रकल्पीय एकूण क्षमता ९.९६ टीएमसी असून ९.७२ टीएमसी इतका पाणीसाठा झाला असून ९८.२९ टक्के धरण भरले आहे, धरणातून ८९३६ क्युसेक्स पाणी विसर्गाद्वारे नदीपात्रात सोडण्यात येत आहे.तारळी धरणाची प्रकल्पीय एकूण क्षमता ५.८५ टीएमसी असून ५.४५ टीएमसी इतका पाणीसाठा झाला असून ९४.२८ टक्के धरण भरले आहे, धरणातून ४४३५ क्युसेक्स पाणी विसर्गाद्वारे नदीपात्रात सोडण्यात येत आहे. वीर धरणाची प्रकल्पीय एकूण क्षमता ९.८३ टीएमसी असून ९.५० टीएमसी इतका पाणीसाठा झाला असून ९६.५० टक्के धरण भरले आहे, धरणातून ५५८८७ क्युसेक्स पाणी विसर्गाद्वारे नदीपात्रात सोडण्यात येत आहे.सातारा जिल्ह्यात पावसाचा वाढता जोर असून धरण पाणलोट क्षेत्रात आज दि.२० ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजेपर्यंत झालेला पाऊस व एकूण पाऊस मिलीमीटरमध्ये पुढीलप्रमाणे कोयना- २७० मिमी.(३९२८ मि.मी.), नवजा ३८७ मिमी. (४८२२ मि.मी.),महाबळेश्वर ३०८ मिमी.(४५०८ मि.मी.),धोम ४७ मिमी.( ५६१ मि.मी.), धोम बलकवडी १९७मिमी.(२२३७ मि.मी.), कण्हेर ४९ मिमी.(६९० मि.मी.), उरमोडी ६२ मिमी. ( १२१७ मि.मी.),तारळी ६० मिमी.(१३३६ मि.मी.), वीर १४ मिमी.( २१० मि.मी.).

# महसूल प्रशासनाची सतर्कतेने आजींना मिळाला दिलासा





सातारा : तारळी धरण परिसरात पाण्याची पातळी पाहणी करताना महसूल प्रशासनाने एका वृद्ध महिलेला दिलासा देत एक अघटीत प्रसंग टाळला.

ग्राम महसूल अधिकारी मोहिनी शिंदे, मंडळाधिकारी किशोर वाडकर व तोंडोशीचे पोलिस पाटील किरण सपकाळ आवर्डे नागरिकांना सतर्कतेच्या सूचना देत असताना पुलाकडे जात असलेल्या एका आजींना थांबवले. त्यांना धोक्याची जाणीव करून दिल्यावर आजींच्या डोळ्यात अश्रू आले. त्यांनी सांगितले की त्यांचे पती सकाळी दहा वाजता घरातून बाहेर पडले असून दुपारी तीनपर्यंत परतले नाहीत. मोबाईल नसल्यामुळे त्यांचा ठावठिकाणा लागत नव्हता.

प्रशासनाने आजींना धीर देत त्यांच्या पतीचा शोध सुरू केला. ग्रामस्थ व पोलिस पाटील यांच्या मदतीने हरवलेले आजोबा अखेर तारळी धरणाच्या पुलाजवळ आढळले. त्यांना सुखरूप घरी आणून आजींसोबत सोडण्यात आले. संध्याकाळी सहा वाजता धरणाच्या पाण्याचा विसर्ग वाढविण्यात आला होता. त्यावेळी प्रशासनाची तत्परता नसती तर गंभीर प्रसंग घडला असता. जनहिताय सर्वदा या भावनेचे उत्तम उदाहरण या कार्यातून दिसून आले.

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय येथे ‘हर घर तिरंगा’ अभियान

कराड : शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कराडच्या मुलींचे वसतिगृह ‘जिजाऊ’ येथे हर घर तिरंगा अभियानांतर्गत प्रबोधनपर कार्यक्रम झाला. राष्ट्र सेवा समितीच्या समाजसेविका सौ. सुषमा काळे व सहकारी भगिनींनी देशभक्तीविषयक प्रश्नमंजुषा, पद्य, खेळांचे आयोजन केले. महाविद्यालयाच्या प्राध्यापिका वैशाली बोगर, पद्मप्रिया वळवडे



यांनी राष्ट्रध्वज तिरंग्याचा इतिहास व गौरवगाथा सादर केली.

वसतिगृह अधीक्षक कल्पना मोरे, वॉर्डन शितल चव्हाण यांच्यासह महिला सहकारी व सर्व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. समन्वय सहाय्यक प्राध्यापक वैशाली बोगर यांनी केले. प्राचार्य डॉ. संजीव वाघ, डेप्युटी डायरेक्टर प्रा. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाने हा उपक्रम राबविण्यात आला. प्रत्येक मुलगी स्वयंसिद्ध व सबळ बनून राष्ट्रकार्यासाठी कार्यरत झाली पाहिजे असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# अभंग पाठांतर स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण

## श्रावणी गावडे प्रथम क्रमांक

बेळगांव(प्रतिनिधी) : कावळेवाडी (तालुका बेळगांव) येथील राष्ट्रपिता महात्मा गांधी सामाजिक संस्थेने विद्यार्थ्यांसाठी श्रावण महिन्याचे औचित्य साधून श्री हरिपाठ अभंग पाठांतर स्पर्धा आयोजित केल्या होत्या. या स्पर्धेत श्रावणी शशिकांत गावडे हिने प्रथम येण्याचा मान पटकावला.

अध्यक्षस्थानी ह.भ.प.शिवाजी जाधव उपस्थित होते. वाय पी नाईक यांनी स्वागत केले मुख्याध्यापक के. पी बेळगावकर, किशोर पाटील यांचा सन्मान करण्यात आला. हरिपाठ अभंग पाठांतर स्पर्धेचे पहिले पाच विजेते.प्रथम क्रमांक श्रावणी श.गावडे(कावळेवाडी शाळा सहावी) द्वितीय स्वरा म पाटील (बालवीर बेळगुंदी इ.चौथी) तृतीय क्रमांक सानिका सु.बाचीकर(इ नववी बिजगर्णी हायस्कूल) चौथा आदित्य वि.देवाण(इ ४ थी, बालवीर बेळगुंदी) पाचवा नम्रता ल सुतार



(नववी, बिजगर्णी हायस्कूल) उत्तेजनार्थ वैभवी य गावडे (इ.तिसरी कावळेवाडी) या विजेत्यांचा सन्मानित करण्यात आले.

के.पी.बेळगावकर यांनी मनोगत व्यक्त करताना, बालवयात वाचनाची आवड निर्माण करणे आवश्यक आहे मोबाईल वापर कमी करावा.संत साहित्य श्रेष्ठ आहे.

अभंग वाचनातून, श्रवण मनन चिंतन केल्यास एकाग्रता वाढते.अभ्यास करायला चैतन्य येते. शिवाजी जाधव यांनीही मनोगत व्यक्त केले. अध्यक्ष वाय पी नाईक, शिवाजी जाधव,एम.पी मोरे, गौतम कणबरकर,चुडाप्पा यळुरकर, पांडुरंग मोरे, लक्ष्मण जाधव, ग्रामस्थ मंडळ चेअरमन जोतिबा मोरे,विनय नाईक,सौ वनश्री पाटील, शशिकांत गावडे, यल्लापा गावडे, सुनील बामणे, पुंडलिक मोरे, अशोक यळूरकर, विजयकुमार देवाण, मल्लापा मोरे उपस्थित होते.

सूत्रसंचालन कोमल गावडे यांनी केले.आभार किशोर पाटील यांनी मानले.

# सावित्रीबाई फुले आधार योजनेस मुदतवाढ

सातारा : जिल्हास्तरावरील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या मान्यताप्राप्त शासकीय, शासन अनुदानित आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालय, तंत्रनिकेतनांमध्ये प्रवेश घेणाऱ्या व वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना लाभासाठी दि. १७ ऑगस्ट पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक डॉ. कांचन जगताप यांनी केले आहे.

योजनेचा लाभ घेणेकरीता इयत्ता १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेणारे व ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये २.५० लाख पेक्षा कमी आहे असे विद्यार्थी पात्र आहेत. जिल्ह्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास प्रतिवर्ष रुपये ४३ हजार व तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्ष रूपये ३८ हजार या प्रमाणे लाभाचे वितरण केले जाणार आहे. सदर योजनेंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या १५०, द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या १५०, तृतीय वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० व चतुर्थ वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० अशा एकूण ६०० विद्यार्थ्यांची लाभाकरीता निवड केली जाणार आहे.

तरी सदर योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी बी.ए/बी.कॉम/बी.एस.सी अशा १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी आणि एम.ए./एम.एस.सी. असे पदवी नंतरचे पदव्युत्तर अभ्यासक्रम (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) शिक्षण घेणाऱ्या प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना दि. २७ ऑगस्ट पर्यंत https://hmas.mahait.org या ऑनलाईन पोर्टलवर प्रवेश अर्ज करावेत. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्या अर्जाची प्रिंट सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, सातारा यांचे कार्यालयात जमा करावी.

# महाराष्ट्र हायस्कूलच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार



कराड : श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट कराड संचालित महाराष्ट्र हायस्कूल व श्री शिवाजी विद्यालय प्राथमिक शाळेत स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आर.आय.टी. इंजिनियरिंग कॉलेजचे प्राध्यापक डॉ. प्रवीण देसाई उपस्थित होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक दीपक लादे होते. प्रा. अतुल लाड, प्रवीण किसन शेवाळे यांची विशेष उपस्थिती होती.

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनी श्रावणी पोळ हिने बनविलेल्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन डॉ. प्रवीण देसाई यांच्या हस्ते झाले. माजी विद्यार्थी अमोल पाटील याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत यश मिळवून सातारा जिल्हा परिषद बांधकाम विभागात निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. अश्विनी थोरात हिनेही स्पर्धा परीक्षेत यश संपादन करून गोंदिया येथे नेमणूक मिळविल्याबद्दल तिचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

या प्रसंगी दोन्ही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून कष्टातून यश कसे मिळविता येते याची प्रेरणादायी उदाहरणे दिली. एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी संचलन केले. ऋतुजा कचरे, सिमरन गायकवाड, महंमद शेख यांनी भाषणे केली. नानासो खाडे यांनी देशाला स्वातंत्र्य कसे मिळाले याबाबत विचार मांडले. प्रास्ताविक शशिकांत शिंदे यांनी केले. आभार संदीप घुलूम यांनी मानले.

# विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप



बेळगाव(प्रतिनिधी) : पश्चिम विभाग शिक्षण मंडळ संचलित बिजगर्णी हायस्कूलमध्ये गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना मोफत सायकलींचे वाटप करण्यात आले. संस्थेचे उपाध्यक्ष एस.एम. जाधव अध्यक्षस्थानी होते. सामाजिक कार्यकर्ते संतोष दरेकर व सुभेदार मेजर सुधाकर जाळके उपस्थित होते. प्रारंभी विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर केले. दीपप्रज्वलनानंतर शाळेच्या ४० वर्षांच्या प्रगतीचा आढावा माजी मुख्याध्यापक वाय.एच. पाटील यांनी मांडला.

मान्यवरांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर छंद जोपासण्याचे, जिद्द व चिकाटीने शाळा व गावाचा नावलौकिक वाढवण्याचे मार्गदर्शन केले. शाळेच्या प्रगतीसाठी सर्वतोपरी सहकार्य करू, अशी ग्वाही प्रमुख पाहुण्यांनी दिली.

# मंत्री मकरंद जाधव-पाटील यांची राज्य आपत्कालीन कार्य केंद्राला भेट

## अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा घेतला आढावा



सातारा : राज्यात अनेक ठिकाणी सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी आज मंत्रालयातील राज्य आपत्कालीन कार्य केंद्राला भेट देऊन अतिवृष्टीमुळे राज्यात उद्भवलेल्या परिस्थितीचा आढावा घेतला.

मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी या भेटी वेळी राज्यात अतिवृष्टीमुळे निर्माण परिस्थितीची माहिती घेऊन पावसामुळे उद्भवलेली पूरस्थिती, वाहतुकीतील अडथळे, पिकांचे नुकसान आणि आपत्कालीन सेवांच्या कार्यवाहीची माहिती घेतली. आवश्यक तेथे राज्य आपत्ती प्रतिसादात दल व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची पथके पाठवावीत अशा सूचना त्यांनी दिल्या. अतिवृष्टीमुळे नदीकाठच्या लोकांचे स्थलांतर सुरक्षितस्थळी करावे. या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात. यासाठी प्रशासनाने वेगाने कारवाई करावी, आशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

पावसामुळे बाधित होणाऱ्या शेत पिकांचे तातडीने पंचनामे करावेत, अतिवृष्टी काळात विशेषतः नद्या, धरणे व पाणीपातळीवर सतत लक्ष ठेवून आवश्यकतेनुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना करून हवामान विभागाशी सतत संपर्क साधून येणाऱ्या पावसाचा अंदाज जनतेपर्यंत वेळीच पोहचवण्यात याव्यात असेही मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.

**राज्य आपत्कालीन कार्य केंद्राचे संचालक डॉ. भालचंद्र चव्हाण यांनी अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली परिस्थिती, मदत व बचाव कार्य या विषयी माहिती दिली. अतिवृष्टीमुळे बाधित राज्यातील विविध जिल्ह्याचा आढावा घेत असताना मंत्री मकरंद पाटील यांनी सातारा जिल्ह्यातील वाई, महाबळेश्वर, पाटण,कराड ,सातारा येथील पूर परिस्थितीचा आढावा घेतला. धरणातून विसर्ग करण्यात आल्याने नदीलगतच्या नागरिकांच्या सुरक्षिततेची योग्य ती काळजी/खबरदारी घेण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या.**

# इतर मागास बहूजन कल्याण विभागाचे लाभ घेण्याचे आवाहन

सातारा - इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून राज्यातील महानगरपालिका, विभागीय शहरे आणि जिल्हास्तरावरील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या मान्यताप्राप्त शासकीय, शासन अनुदानित आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालय, तंत्रनिकेतनांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील १२ वी नंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या प्रथम वर्षातील विदयार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह ही योजना सुरू करण्यात आलेली आहे. सदर योजनेंतर्गत विदयार्थ्यांना दरमहा भोजन, प्रतिवर्षी शैक्षणिक साहित्य, आरोग्य इ. करीता प्रतिवर्ष भत्ता वाटप केला जातो. या योजनेचा लाभ घेणेकरीता बी.ए, बी.कॉम, बी.एस.सी अशा १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी आणि एम.ए, एम.एस.सी. असे पदवी नंतरचे पदव्युत्तर अभ्यासक्रम (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) शिक्षण घेणारे व ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये २.५० लाख पेक्षा कमी आहे असे विद्यार्थी पात्र असून जिल्ह्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास प्रतिमाह भोजन भत्ता रुपये ४,५००/-, निर्वाह भत्ता प्रतिमाह रुपये ६००/-, मुलींकरीता स्वच्छता भत्ता प्रतिमाह रुपये २००/-, नाईट ड्रेस, महाविदयालयीन गणवेश, शैक्षणिक सहल, प्रोजेक्ट रिपोर्ट याकरीता प्रतिवर्ष भत्ता वाटप केला जातो.या योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी इयत्ता १२ वी नंतरचे बिगर व्यावसायिक उच्च शिक्षण घेणाऱ्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना दि. २७ ऑगस्ट पर्यंत ऑनलाईन पोर्टलवर https://hmas.mahait.org प्रवेश अर्ज भरता येणार आहे. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्या अर्जाची प्रिंट सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, सातारा यांचे कार्यालयात जमा करावयाची आहे. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज दाखल करावेत असे अवाहन डॉ. कांचन जगताप, सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, सातारा यांनी केले आहे.

# पं.दिनदयाल उपाध्याय लाभ योजनेस मुदतवाढ

सातारा : इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून राज्यातील महानगरपालिका, विभागीय शहरे, जिल्हास्तरावरील सर्व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश घेतलेल्या मान्यता प्राप्त शासकीय, अनुदानीत व कायम विनाअनुदानीत महाविद्यालय, तंत्रनिकेतन मध्ये प्रवेश घेणाऱ्या व वसतिगृह योजनेपासून वंचित असणाऱ्या धनगर समाजातील विद्यार्थी निवासी व शैक्षणिक सुविधांपासून वंचित राहू नये यासाठी पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयं योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत बी.ए/बी.कॉम/बी.एस.सी अशा १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी आणि एम.ए /एम.एससी असे पदवीनंतरचे पदव्युत्तर अभ्यासक्रम महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षाकरिता ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता शासनाचे वेळापत्रक जाहिर झाले आहे. या योजनेचे अर्ज् भरण्यासाठी दि. २७ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या धनगर समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्यान कांचन जगताप यांनी केले आहे.

# चाफळ विभागातील जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वाटप

## मंत्री शंभूराज देसाई यांची प्रेरणा

उंब्रज : सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय नामदार श्री शंभूराज देसाई साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रेरणेने चाफळ विभागातील डोंगराळ व दुर्गम भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पालकमंत्री शंभूराज देसाई साहेबांचे चाफळ विभागातील निष्ठावंत कार्यकर्ते भरत साळुंखे उर्फ भाऊ यांनी छत्र्यांचे वाटप केले. महाबळवाडी, दाढोली, मसुगडेवाडी, खोनोली, कोचरेवाडी, मधलीवाडी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना सोमवारी कोअर कमिटी चाफळ विभागाच्या वतीने छत्र्या देण्यात आल्या. पावसाळ्यात शाळेत जाताना विद्यार्थ्यांना होणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन या




उपक्रमाचे अंमलबजावणी करण्यात आल्याचे भरत साळुंखे यांनी सांगितले. छत्र्या मिळाल्याने पावसाच्या सरींपासून संरक्षण मिळणार असल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे गोड हास्य फुलले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरला असून पालकांनीही समाधान व्यक्त केले.दरम्यान, अतिवृष्टीमुळे दोन दिवस शाळांना सुट्टी असल्यामुळे सध्या छत्री वाटप थांबवण्यात आले असून शाळा सुरू झाल्यानंतर उर्वरित शाळांमध्ये छत्री वाटप करण्यात येणार आहे.

# डोंबिवलीत भव्य आरोग्य शिबीर

**(गुरुनाथ तिरपणकर)**



डोंबिवली : स्वातंत्र्य दिनानिमित्त इनरव्हील क्लब ऑफ डोंबिवली पश्चिम, लाल बावटा रिक्षा युनियन डोंबिवली आणि सिटीझन वेलफेअर असोसिएशन बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला डोंबिवलीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून शंभरपेक्षा अधिक नागरिकांनी सहभाग घेत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.

शिबिरात एलपीझो सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर डोंबिवली तसेच ट्रायम्फ ब्लड सेंटर ठाणे यांनी सेवा प्रदान केली. नागरिकांसाठी ईसीजी, रक्तदाब, डोळ्यांची तपासणी आणि रक्तशर्करा तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

क्लबच्या अध्यक्षा लक्ष्मी चयनी, सचिव बबिता अत्रे, प्रकल्प प्रमुख गीता कुलकर्णी, आरोग्य शिबिराच्या प्रकल्प प्रमुख अमृता केतकर यांनी विशेष प्रयत्न केले. लाल बावटा रिक्षा युनियनचे अध्यक्ष कॉम्रेड काळू कोमस्कर, कार्याध्यक्ष राजू परांजपे, सचिव कॉम्रेड प्रवीण पाटील, उपाध्यक्ष कॉम्रेड अरुण वेळास्कर यांच्या प्रयत्नांमुळे हा स्वातंत्र्योत्सव संस्मरणीय ठरला. सचिव राजेंद्र नरसाळे, डॉ. अमितकुमार गोईलकर यांनी शिबिरासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

# कायदेशीर जनजागृती कार्यक्रम संपन्न

सातारा : जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्षा श्रीमती सुरेखा कोसमकर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण उच्च न्यायालय,मुंबई यांचे आदेशान्वये यशोदा पॉलिटेक्नीक व इंजिनिअरिंग कॉलेज सातारा यांचे संयुक्त विद्यमाने दि. १९ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता रॅगिंग प्रतिबंधित कायदा, ड्रग्ज गैरवापर आणि अवैध तस्करीबाबत कायदा, नालसा योजना, वाहतूकीचे नियम व महिलांची सुरक्षा व कायदा या विषयांवर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमामध्ये सचिव जिल्हा विधी व सेवा प्राधिकरण निना बेदरकर यानी कायदेशीर मदत, नालसा मालसाच्या विविध कल्याणकारी योजनांविषयी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. चौथे सहदिवाणी न्यायाधीश रितेश मावतवाल यांनी रॅगिंग प्रतिबंध कायदा या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. सामाजिक कार्यकर्ते किशोर काळोखे यांनी ड्रग्ज गैरवापर आणि अवैध तस्करी विरोधी दिन या विषयी माहिती सांगितली.

एपीआय अभिजीत यादव यांनी वाहतुकीचे नियम याविषयावर मार्गदर्शन केले.ड मनिषा बर्गे मध्यस्थी विधी सेवा प्राधिकरण यांनी महिलांची सुरक्षा व कायदा याविषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव निना बेदरकर, ४ थे सहदिवाणी न्यायाधीश रितेश मावतवाल, किशोर काळोखे, एपीआय अभिजीत यादव,ड मनिषा बर्गे मध्यस्थी विधी सेवा प्राधिकरण आदी उपस्थित होते.

# बिबट्याच्या हल्ल्यात कुत्रा जखमी

## घटनास्थळी वनविभागाची धाव



**उंब्रज(प्रतिनिधी):** नाणेगाव(पुनर्वसन), ता.कराड परिसरात वास्तव्यास असलेले वखार व्यवसायिक सचिन उत्तम पवार यांच्या पाळीव कुत्र्यावर बिबट्याने हल्ला करत जखमी केल्याची घटना घडली असून याची माहिती लागताच वनविभागाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिसराची पाहणी केली.

याबाबत सचिन पवार यांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार,बुधवार दिनांक २० ऑगस्ट रोजी मध्यरात्री दीडच्या सुमारास कंपाउंडमध्ये बांधलेल्या कुत्र्याचा ओरडण्याचा आवाज आल्यामुळे पवार यांना जाग आली.त्यानंतर त्वरित दरवाजा उघडून बाहेर गेले असता चाहूल लागल्यामुळे बिबट्याने धूम ठोकली.

दरम्यान,बिबट्यासोबत झालेल्या झटापटीत कुत्रा जखमी झाला असून पाठीवर,गळ्यावर बिबट्याच्या नख्यांचे ओरखडे दिसून आले आहेत.याची माहिती वनविभागाचे शंभूराज माने यांना लागताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिसराची पाहणी केली.

सचिन पवार यांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे बिबट्याच्या हल्ल्यातून सुदैवाने कुत्रा थोडक्यात बचावला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

# चोराडे फाटा ते रायगाव रस्त्यावर नुसता चिखलच

## ठेकेदाराचे दुर्लक्ष : काँक्रिटीकरणाचे काम संथगतीने सुरू

**(सनी लोहोरा)**

पुसेसावळी : खटाव तालुक्यातून जात असलेल्या मल्हारपेठ-पंढरपूर राज्यमार्गा वरील मल्हारपेठ ते मायणी या ६० किलोमीटर रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे काम अत्यंत संथगतीने सुरू आहे. चोराडे फाटा ते रायगाव रस्त्यावर वाहनचालक व स्थानिक नागरिकांना या रस्त्यावरून चिखलातूनच मार्ग काढून प्रवास करताना कसरतच करावी लागत आहे.



शामगाव घाट ते मायणी या कामासाठी खोदकाम रस्त्याच्या करण्यात येत असल्याने रस्त्याच्या कामात वापरण्यात येणारा मोठ्या प्रमाणावर माती मिश्रित मुरूम टाकून रस्त्याची लेवल करण्याच्या ठेकेदाराच्या आडमुठ्या धोरणामुळे रस्त्यावर चिखलच चिखल झाल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. ठेकेदाराने पर्यायी रस्ता करण्याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले आहे,त्यामुळे या मार्गावरून जाणाऱ्या वाहनचालकांना आणि प्रवाशांना चिखलातून मार्ग काढत प्रवास करावा लागत आहे. प्रशासनाने त्वरित लक्ष घालून निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ व प्रवासी वर्गाकडून होत आहे. तसेच वाहने चालवतांना वाहने घसरत आहेत.

**ग्रामस्थांच्या मागणीकडे दुर्लक्ष..**

**संबंधित ठेकेदार आणि प्रशासनाच्या अधिकाऱ्यास स्थानिक ग्रामस्थांनी वारंवार सूचना करून रस्त्यावर ताबडतोब मुरूम टाकून रस्ता व्यवस्थित करून द्यावा, रस्त्यावरील चिखलामुळे प्रवास करताना जीव मुठीत धरून गाडी चालवावी लागत आहे, तरीही ग्रामस्थांच्या या मागणीकडे संबंधितांकडून गांभीर्याने लक्ष दिले जात नाही.**

# गोवा बनावटीचे विदेशी मद्य वाहतूकीवर कारवाई

## १ कोटी २२ लाचा मुद्देमाल जप्त

सातारा - राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक सातारा या कार्यालयाने १९ ऑगस्ट रोजी पुणे आशियाई महामार्गावर तासवडे टोलनाक्यावर सापळा रचून महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंधीत व गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य वाहतुकीवर कारवाई करून आरोपीच्या ताब्यातून १ कोटी २२ लाख ७६ हजार २०० रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला.

करण्यात आलेल्या कारवाईत गोवा राज्य बनावट विदेशी मध्य रॉयल ब्ल्यू माल्ट व्हिस्की १८० मि.ली क्षमतेच्या ४८९६० बाटल्या (१०२० बॉक्स), आयशर कंपनीचा सहाचाकी ट्रक जिचा क्र. एमएच-४३-बोएक्स-९४०८ व जुना वापरता ओपो कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आले या जप्ती मुद्देमालाची एकूण किंमत १ कोटी २२ लाख ७६ हजार २०० रुपये इतकी आहे.

यातील आरोपी आकाश चंद्रकांत घोटकुले वय २९ वर्षे, रा. उसे ता. मावळ जि. पुणे याच्यावर महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ (अ) (ई).९०.१०३.१०८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, आयुक्त डॉ. राजेश देशमुख, अमंलबजावणी व दक्षता महाराष्ट्र राज्य सह आयुक्त प्रसाद सुर्वे, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापुर विभाग विभागीय उप-आयुक्त कोल्हापूर विजय चिचांळकर यांच्या निर्देशानुसार, सातारा राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक बाबासाहेब भुतकर यांचे मार्गदर्शनाखाली निरीक्षक, सातारा येथील राज्य उत्पादन शुल्कचे भरारी पथकाचे निरीक्षक माधव चव्हाण, दुय्यम निरीक्षक अजय पाटील, सहा. दुय्यम.निरीक्षक पांडुरंग कुंभार, जवान राणी काळोखे, मनीष माने, विनोद बनसोडे, अरूण जाधव कारवाईत यांनी भाग घेतला. गुन्ह्याचा पुढील तपास माधव चव्हाण, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, सातारा हे करीत आहेत.

जिल्हयामध्ये बनावट दारु तसेच हातभट्टी दारु निर्मिती, विक्री, वाहतूक तसेच इतर कोणत्याही प्रकारच्या दारुची निर्मिती, विक्री व वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची माहिती तात्काळ या कार्यालयास देण्यात यावी, असे आवाहन बाबासाहेब भुतकर, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सातारा यांनी केले आहे.